**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत महाराष्ट्र वन विकास महामंडळातील सक्षम अधिका-यांना तांत्रिक प्रशासकीय मान्यता विषयक अधिकार प्रदान करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**महसुल व वन विभाग**

**शासन निर्णय क्रमांक : एफडीसी-२०१७/रोहयो/प्र.क्र.५/फ- ५**

मंत्रालय, मुंबई -४००० ०३२

दिनांक :- १८ एप्रिल, २०१८

**वाचा** - १. शासन निर्णय, नियोजन विभाग क्र.मग्रारो-२०१६/प्र.क्र.१०२/मग्रारो-१, दि.२९.९.२०१६

२. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ, नागपूर यांचे आदेश क्र.प्रशा/आस्था-३/६५, दि.०५.०४.२०१८

**प्रस्तावना -**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत वनीकरण तसेच मृद आणि जलसंधारणाची कामे प्राधान्याने करण्याबाबत केंद्र शासनाचे निर्देश आहेत. त्याचप्रमाणे वाढते जागतिक तापमान व हवामान बदल इत्यादी नैसर्गिक आपदांना सामोरे जाण्याकरीता व्यापक प्रमाणावर वनीकरण करण्याचा शासनाचा मनोदय आहे. या पार्श्वभूमीवर शासनाने ३ वर्षामध्ये ५० कोटी वृक्ष लागवडीचा महत्वाकांक्षी उपक्रम हाती घेतला आहे. वनी करणाची मोहिम राबविण्याकरीता महात्मा गांधी नरेगा योजनेचा विशेष सहभाग आवश्यक आहे. त्याअनुषंगाने उपरोक्त दिनांक २९.०९.२०१६ च्या शासन निर्णयान्वये वन विभागातील सक्षम अधिका-यांना तांत्रिक व प्रशासकीय मंजूरीचे अधिकार प्रदान करण्यात आले आहेत. वृक्ष लागवडीचा महत्वाकांक्षी उपक्रम राबविण्यासाठी महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत उपक्रम असलेल्या महाराष्ट्र वन विकास महामंडळातील सक्षम अधिका-यांना तांत्रिक व प्रशासकीय मंजूरीचे अधिकार प्रदान करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासननिर्णय:-**

महाराष्ट्र वन विकास महामंडळाच्या वन प्रकल्प विभागामध्ये रोपवाटीका, रोपवन व मृद जलसंधारणाची कामे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत मोठया प्रमाणात केली जातात. त्यामुळे कामाच्या अंदाज पत्रकांना सक्षम अधिका-याद्वारे तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी देणे, हजेरी पत्रके निर्गमित करणे, भरणे आणि कुशल / अकुशल बाबींचे भूगतान करणे इत्यादी बाबीत अडचणी निर्माण होऊ नयेत यासाठी व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ यांनी उपरोक्त दिनांक ५.४.२०१८ च्या आदेशान्वये

महामंडळातील सक्षम अधिका-यांना तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेचे अधिकार प्रदान केले आहेत. त्यानुसार महामंडळातील सक्षम अधिका-यांना खालील प्रमाणे तांत्रिक व प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

| Sr. No. | Sr.No of MD's Power | Nature of Power | सक्षम अधिकारी | तांत्रिक मंजूरीची मर्यादा (लाखात) | प्रशासकीय मंजूरीची मर्यादा (लाखात) |
|---|---|---|---|---|---|
| १ | ६६ | Expenditure on forestry works including regeneration and SMC works | वनपरिक्षेत्र अधिकारी | २५.०० | -- |
| | | | सहाय्यक व्यवस्थापक | ५०.०० | २५.०० |
| | | | विभागीय व्यवस्थापक | ७५.०० | ५०.०० |
| | | | प्रादेशिक व्यवस्थापक/ महाव्यवस्थापक/ मुख्य महाव्यवस्थापक | ७५.०० पेक्षा अधिक | ७५.०० पर्यंत |

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०४१८१६१५३०४२१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sujay Dodal

Digitally signed by Sujay Dodal
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=353112ee0fa47f9ff9bedae88f651d09fdb142df5fbce9c004f7eea06d8b9baf, cn=Sujay Dodal
Date: 2018.04.18 16:16:30 +05'30'

**(सुजय दोडल)**

सह सचिव, महसूल व वन विभाग

**प्रति,**

(१) प्रधान मुख्य वनसंरक्षक(वनबल प्रमुख) , महाराष्ट्र राज्य, नागपूर
(२) प्रधान मुख्य वनसंरक्षक(वन्यजीव) , महाराष्ट्र राज्य, नागपूर
(३) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ, नागपूर
(४) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक(अर्थसंकल्प नियोजन व विकास ), महाराष्ट्र राज्य, नागपूर
(५)महालेखापाल, १/२ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखापरीक्षा), मुंबई/नागपूर.
(६) ब-१/फ-१ कार्यासन, महसूल व वन विभाग ,मंत्रालय, मुंबई.
(७) निवड नस्ती, फ-५